(67)

महाराष्ट्र शासन

# कार्यालय, विभागीय शिक्षण सहसंचालक,
## उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड

(शासकीय तंत्रनिकेतन परिसर, नांदेड. फोन: ०२४६२-२८११४४) Email: jdhe.nanded@yahoo.co.in

जा.क्र.: विशिरारां/उशि/नावि/अनु-२/पदमान्यता/२०१८-१९/ 166 दि. 4/1/2018

प्रति,

प्राचार्य,

के. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय,

उदगीर जि. लातूर.

**विषय : सन २०१७-१८ च्या विद्यार्थी संख्येनूसार शिक्षक पदे मंजूर करुन मिळणे यावत.**

संदर्भ :
१) शासन निर्णय यु.एस.सी. /११७८५/२५५१/रोमन-३२ सेल, दि. १९/०६/१९७८
२) शासन निर्णय एनजीसी /२०८०/१५०२८४/५९८७/यु.जीएम-२, दि. ०१/०६/१९८१
३) शासन निर्णय एनजीसी /१२८६/१२२४/युजीएफ-४, दि. २७/०२/१९८९
४) शासन निर्णय बीजीटी /१०९७/प्र.क्र.२४/अ/अर्थसंकल्प-१९, दि. १५/१२/१९९८
५) शासन निर्णय असफ-१००१, प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दि. १०/०९/२००१
६) शासन निर्णय क्र. युएसजी-१४१३/(२६) मशि-२ दि. १७/०५/१९९४
७) शासन निर्णय क्र.एनजीसी/२२९९/(४७९५)/विशि-४ दि. २६/०८/१९९९
८) शासन निर्णय असफा-१००१,प्र.क्र.२९/(भाग-१)/२००२/वित्तीय सुधारणा, दि.०९/०१/२००३
९) शासन निर्णय असक-१००१, प्र.क्र.२९/(भाग-६)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दि. १/७/२००४
१०) शासन निर्णय एसआरव्ही-२००७/प्र.क्र.१२९/०७/१२, दि. २७/०८/२००७
११) शासन परिपत्रक. एनजीसी-२०१०/(४१५/१०)/विशि-१, दि.०७/०९/२०११
१२) शासन निर्णय संकीर्ण -२०११(४०४/११)/विशि-१, दि. १९/१०/२०११
१३) शासन निर्णय क्र.अढावा -१५१३/प्र.क्र. १२५/मशि-५ दि. ०३/११/२०१८
१४) शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.अशाम/२०१७/महा.पदांचा आढावा/मवि-१,
१५) आपले पत्र क्र.१५० दि. ०३/११/२०१७

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १५ नुसार प्राप्त झालेल्या प्रस्तावामधील आपल्या महाविद्यालयातील दि.१ ऑक्टोबर २०१७ च्या विद्यार्थी संख्येच्या आधारावर विषय निहाय विद्याशाखा निहाय कार्यभार तपासण्यात आला आहे. शासनाने विहित केलेल्या मानकानुसार कार्यभाराची परिगणना करुन खालील अटिच्या अधिन राहून आपल्या महाविद्यालयातील शिक्षक पदे अनुज्ञेय करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | विषय | २०१७-१८ चा एकुण कार्यभार | २०१७-१८ ची अनुज्ञेय पदे | | २०१७-१८ ची भरलेली पदे | २०१७-१८ ची रिक्त पदे | २०१७-१८ ची अतिरिक्त पदे | २०१७-१८ ची संरक्षीत पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्ण वेळ | शिल्लक ता. | | | | | |
| १ | प्राचार्य | 0 | 1 | | 0 | 1 | | | |
| २ | इंग्रजी | 38 | 2 | 0 | 1 | 1 | | | |
| ३ | मराठी | 36 | 2 | | 2 | 0 | | | |
| ४ | हिंदी | 36 | 2 | | 2 | 0 | | | |
| ५ | अर्थशास्त्र | 28 | 1 | 10 | 1 | 0 | | | |
| ६ | समाजशास्त्र | 28 | 1 | 10 | 1 | 0 | | | |
| ७ | इतिहास | 28 | 1 | 10 | 1 | 0 | | | |
| ८ | राज्यशास्त्र | 28 | 1 | 10 | 1 | 0 | | | |
| ९ | होमसायन्स | 25 | 1 | | 1 | 0 | | | |
| १० | तत्वज्ञान | 20 | 1 | | 1 | 0 | | | |
| ११ | भुगोल | 39 | 2 | | 1 | 1 | | | |
| १२ | शा.शि.सं. | | 1 | | 1 | 0 | | | |
| १३ | ग्रंथपाल | | 1 | | 1 | 0 | | | |
| | एकुण | 306 | 17 | | 14 | 3 | 0 | 0 | |

Scanned by CamScanner

प्रति,

टिप : शासन निर्णय दिनांक ०३.११.२०१८ नुसार पदांची अनुज्ञेयता ठरवितांना, पदांचा आढावा अंतिम झाला नसल्याने सदर अनुज्ञेय पदे अंतिम नाहीत हे आपणास निदर्शनास आणून देण्यात येत आहे

१ प्रस्तुतचा कार्यभार महाविद्यालयात कार्यरत असलेल्या अनुदानित विद्याशाखा/ तुकडया/ विषय व प्रवेशित विद्यार्थी संख्या विचारात घेऊन परिगणीत होणारा कार्यभार अनुज्ञेय करण्यात आलेला आहे.

२ महाविद्यालयाने पदनिश्चितीसाठी सादर केलेल्या प्रस्तावात नमूद केलेल्या विद्याशाखा/तुकडया/ विषय विद्यापीठाने प्रमाणित केलेल्या विद्यार्थीसंख्येची प्रत्यक्ष महाविद्यालयात पटनोंदणी अनिवार्य आहे.

३ अनुदानासाठी अनिवार्य असलेली विद्यार्थीसंख्या व कार्यभार परीगणनेसाठी कमाल विद्यार्थी संख्या विचारात घेण्यात यावी.

४ प्रात्यक्षिकांसांठी शासन नियमानुसार विहित केलेल्या विद्यार्थी संख्येची बॅच (गट ) अनिवार्य राहील.

५ **व्याख्याने / प्रात्यक्षिके/टयुटोरियल (पाठनिर्देशन ), प्रोजेक्ट वर्क/ (प्रकल्प कार्य ) या करिता नमुद असणाऱ्या तासिका शासनाने विहीत केलेल्या नियमानुसार असणे आवश्यक आहे.**

६ महाविद्यालयास अनुज्ञेय करण्यात आलेल्या पदांनुसार शासनाच्या प्रचलित आरक्षण धोरणानुसार विहीत प्राधिकरणामार्फत आरक्षण बिंदू नामावली प्रमाणित करणे आवश्यक आहे.

७ पुढील शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थीसंख्येत घट झाल्यास किंवा अन्य कारणास्तव अनुदानित विभागातील कार्यभार कमी झाल्यास अनुज्ञेय पदेसंख्या कमी करण्यात येईल.

८ अनज्ञेय पदानुसार शासनाच्या प्रचलित धोरणानुसार शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय पदभरती करण्यात येऊ नये. अशा अनुज्ञेय पदांतर्गत नियुक्त्यांमध्ये अनियमितता आढळून आल्यास अनुदान निर्धारणात सदर बाब अमान्य करण्यात येईल. अनियमित नियुक्तीची जबाबदारी संबंधित व्यवस्थापन व महाविद्यालय यांची राहील.

९ **महाविद्यालयाच्या अनुदान पात्र कार्यभारावर आधारीत पदे अनुज्ञेय करण्यात आलेली आहे. अनुज्ञेय पदांवरील पदभरतीसाठी स्वतंत्र पणे शासनाच्या प्रचलित धोरण व कार्यपध्दतीनुसार प्रस्ताव सादर करुन नाहरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.**

(डॉ. बळीराम पं. लहाने )

सहसंचालक

उच्च शिक्षण, नांदेड विभाग

Scanned by CamScanner